## प्रेस नोट

### जिल्हा पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन

पोलीस अधिक्षक श्री एम.राकेश कलासागर यांचे संकल्पनेतुन अकोला जिल्हा पोलीसांचा कर्तव्य मेळाव्याचे प्रथमताच पोलीस मुख्यालय प्रारंगणामध्ये दिनांक २२,२३,२४ मे २०१८ रोजी कर्तव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले होते.

दरवर्षी पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांची कौशल्यवृध्दी करण्यासाठी अखील भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा आयोजीत केला जात असतो. सदर स्पर्धे मध्ये देशातील व राज्य पोलीस दलातील संघटना आपआपले संघ पाठवुन या कर्तव्य मेळाव्यात आपल्या व्यवसायीक कौशल्याचे प्रदर्शन करून बक्षीस मिळवीणे ही अत्यंत अभिमानाची बाब समजली जात असते याच धर्तीवर अकोला पोलीस दलाचा संघ निवडण्यासाठी तसेच अकोला पोलीस दलाची व्यवसायीक निपुनता उंचावण्याची जाणीव निर्माण करणेसाठी अकोला पोलीस दलानेही पोलीस मुख्यालय येथे सर्व उपविभागातील, शहर विभाग, मुर्तीजापुर, बाळापुर, अकोट, या सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस मुख्यालय येथे बोलावुन त्यांना गुन्हे तपास शास्त्र न्यायवैज्ञानीक शास्त्र, अंगूली मुद्रा शास्त्र, घटनास्थळावरिल भौतीक पुरावे हस्तगत करून ती योग्य रितीने जप्त करण, सिल बंद करणे व प्रयोग शाळेत तपासणी करीता पाठवीणे, घटनास्थळ राखुन ठेवणे त्यांचे फोटोग्राफ घेणे व व्हीडीओ शुटींग करणे तसेच बॉब शोधक व नाशक पथका व्दारे संशईत बंद रुम ची, मोकळी जागेची, बंद वाहनाची तपासणी करणे, श्वान पथकाव्दारे गुन्हेगारांचा शोध घेणे, अमली पदार्थ व विस्फोटक पदार्थाचा शोध घेणे, संगनकाचा पोलीस तपासात वापर करणे या विषयांवर तज्ञांकडुन मार्गदर्शन करून प्रात्यक्षिक सुध्दा स्पर्धकांकडुन करून घेण्यात आले.

सदर कार्यक्रमात मा. पोलीस अधिक्षक एम. राकेश कलासागर साहेब अप्पर पोलीस अधिक्षक विजयकांत सागर साहेब यांनी मार्गदर्शन केले व जे स्पर्धक या स्पर्धेत प्रथम व व्दितीय क्रमांक मिळविण्यास यशस्वी झाले त्यांचा सत्कारही मा.पोलीस अधिक्षक एम. राकेश कलासागर यांच्या हस्ते करण्यात आला.

# अकोला पोलीस

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय





# अकोला पोलीस



अकोला जिल्हा पोलीस कर्तव्य मेळावा - २०१८ मध्ये संगणक व माहिती प्रणाली साठी **मा. एम. राकेश कलासागर पोलीस अधिक्षक, अकोला** यांनी सायबर पो.स्टे चे पोशि/२२९७ **आशिष आमले** यांना पुष्पगुच्छ देवुन गौरविले.